| | | | |
|---|---|---|---|
| MHND190003952019 | खटला दाखल तारीख | : | ११/०४/२०१९ |
| | खटला नोंदणी दिनांक | : | ११/०४/२०१९ |
| | खटला निकाल दिनांक | : | १३/०४/२०२६ |
| | कालावधी | : | ०७ व. ०० म. ०२ दि |

**भाग–'अ'**

**Form No. XXXII**

**(Title Page of the Judgment)**

**(Para 44(i) of Chapter VI of Criminal Manual)**

**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, (न्यायालय क्र. १) ता. लोहा, जि. नांदेड यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी– श्रीमती पी.व्ही.चिद्रे)**

| | |
|---|---|
| **नियमित फौजदारी खटला क्र. ३६/२०१९** | **गु. र. क्र. ३९/२०१९** |
| **CNR: MHND190003952019** | **निशाणी – ३१/ब** |

| | | |
|---|---|---|
| फिर्याद | **महाराष्ट्र शासन तर्फे,**<br>लोहा पोलीस स्टेशन,<br>ता. लोहा, जि. नांदेड. | |
| उपस्थिती | सरकार तर्फे सहा. सरकारी अभियोक्ता **श्री. एस.एस.पाटील** | |
| आरोपी | १. | **अनिल पांडुरंग वानखेडे,**<br>वयः– ३७ वर्षे, व्यवसायः–शेती , |
| | २. | **पांडुरंग विठ्ठल वानखेडे,**<br>वयः– ६२ वर्षे, व्यवसायः– शेती, |
| | ३. | **सौ. वंदना अनिल वानखेडे,**<br>वयः– ३२ वर्षे, व्यवसायः– शेती,<br>राह. सोनमांजरी, ता. लोहा, जि. नांदेड. |
| उपस्थिती | आरोपींतर्फे ॲड श्री. **जी.पी.गवाले** | |

| | |
|---|---|
| **दोषारोप–** | **भारतीय दंड संहिता १८६० कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह ३४ अन्वये.** |

**भाग–'ब'**

**(Para 44(ii) of Chapter VI of Criminal Manual)**

| | | |
|---|---|---|
| (१) | घटना घडल्याचा दिनांक | २१/०३/२०१९ |
| (२) | प्रथम खबर अहवाल दिनांक | २२/०३/२०२३ |
| (३) | दोषारोपपत्र दाखल झाल्याचा दिनांक | ११/०४/२०१९ |
| (४) | दोषारोप निश्चीती दिनांक | १०/०९/२०२५ |
| (५) | पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ११/०३/२०२६ |
| (६) | न्यायनिर्णयासाठी राखुन ठेवलेली दिनांक | --- |
| (७) | न्यायनिर्णयाचा दिनांक | **१३/०४/२०२६** |
| (८) | शिक्षेची तारीख, जर असेल तर | नाही |

## आरोपींचा तपशील

| अ.क्र | आरोपींचे नाव | अटक दिनांक | जमीनावर आरोपीस मुक्त केल्याचा दिनांक | गुन्ह्याचे कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा सुनाव ली | फौ.प्र. सं. कलम ४२८ अन्वये किती दिवस तुरुंगा मध्ये राहिले होते. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | **अनिल पांडूरंग वानखेडे** | ४१ सी.आर.पी.सी. नोटीस अन्वये | १०.०९.२०२५ | भारतीय दंड संहिता १८६० कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह ३४ अन्वये. | **निर्दोष** | नाही | निरंक |
| ०२. | **पांडूरंग विठ्ठल वानखेडे,** | ४१ सी.आर.पी.सी. नोटीस अन्वये | १०.०९.२०२५ | भारतीय दंड संहिता १८६० कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह ३४ अन्वये. | **निर्दोष** | नाही | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०३. | **सौ. वंदना अनिल वानखेडे** | ४१ सी.आर.पी.सी. नोटीस अन्वये | १०.०९.२०२५ | भारतीय दंड संहिता १८६० कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह ३४ अन्वये. | **नि र्दो ष** | ना ही | निरंक |

**भाग–'क'**

**<u>(Para 44(iii) of Chapter VI of Criminal Manual)</u>**

**सरकारी साक्षीदार/ बचावपक्षाचे साक्षीदार/न्यायालयाचे साक्षीदार यांची यादी**

**<u>अ– सरकारी साक्षीदारांची यादी</u>**

| **अ. क्र.** | **साक्षीदारांची नावे** | **निशाणी** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|---|
| सा. क्र. ०१ | रामेश्वर नामदेव लोंढे | २७ | फिर्यादी |
| सा. क्र. ०२ | प्रफुल्लाबाई नामदेव लोंढे | ३० | साक्षीदार |

**ब– बचावपक्ष साक्षीदार**

| **अ.क्र.** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क– न्यायालय साक्षीदार**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**सरकारी साक्षीदार/ बचावपक्षाचे साक्षीदार/न्यायालयाचे साक्षीदार यांची निशानी**

**अ–सरकारी**

| **अ.क्र.** | **वर्णन** | **निशानी क्रमांक** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ब–बचावपक्ष**

| **अ.क्र.** | **निशानी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क–न्यायालय**

| **अ.क्र.** | **निशानी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड–जप्त मुद्देमाल**

| **अ.क्र.** | **निशानी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | निरंक | एक सिमेंटचा दगड |

## न्या य नि र्ण य

**( घोषित दिनांक १३ एप्रिल, २०२६ )**

आरोपींच्या विरोधात भारतीय दंड संहिता, १८६० **(भा.दं.सं.)** चे कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह ३४ अन्वये दंडनीय अपराधाचा दोषारोप ठेवून सदरचा खटला चालविण्यात आला.

## अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत

**०२.** दिनांक २१.०३.२०१९ रोजी रात्री ०८.०० वाजताच्या सुमारास मौजे सोनमांजरी, ता. लोहा, जि. नांदेड, येथे रामेश्वर नामदेव लोंढे (या पुढे **'फिर्यादी'** असे संबोधण्यात येईल.) हे त्यांच्या घरी असतांना आरोपी घरासमोर आले आणि त्यांना व त्यांच्या आईला शिवीगाळ करु लागले. त्यावर फिर्यादीने आरोपींना शिवीगाळ करण्याचे कारण विचारले असता आरोपी क्र. १ याने दगड फिर्यादीच्या डोक्यात मारुन डोके फोडले. सदर भांडण फिर्यादीची आई सोडवण्यासाठी आली असता त्यांना आरोपी क्र. २ पांडुरंग व आरोपी क्र. ३ सौ. वंदना यांनी दगडाने उजव्या पायाच्या मांडीस मारहाण करुन दुखापत केली. तसेच सर्व आरोपींनी फिर्यादी व त्यांची आई प्रफुलाबाई यांना जिवे

मारण्याची धमकी दिली. त्यानंतर फिर्यादीने आरोपींविरुध्द लोहा येथील पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

## अन्वेशन व दोषारोप

**०३.** पोलीस ठाणे लोहा येथे दि. २२.०३.२०१९ रोजी वरील कलमाखाली पहिली खबर क्रमांक ३९/२०१९ नोंदविण्यात आली. तापसिक अंमलदाराने गुन्ह्याच्या तपासादरम्यान दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला. प्रकरणातील मुद्देमाल जप्त केले आणि जप्त मुद्देमालाचा जप्ती पंचनामा तयार करुन मुद्देमाल पावती तयार केली. जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. साक्षीदारांचे जबाब नोंदवले व पुरेशा पुराव्याअंती आरोपींविरुध्द उपरोक्त कलमान्वये दोषरोपपत्र दाखल केले.

## खटला व साक्षीपुरावा

**०४.** निशाणी क्र. १६ अन्वये दोषारोप आरोपींना वाचून दाखवला. त्यांनी नि.क्र. १७ ते १९ अन्वये गुन्हा मान्य न करता संपरिक्षा करण्याची मागणी केली. अभियोग पक्षातर्फे खटल्यात एकुण दोन साक्षीदार तपासले. त्यानंतर दिनांक १३/०४/२०२६ रोजी अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला व त्या संदर्भाचा आदेश नि.क्र. ०१ वर पारीत केला. आरोपींविरुध्द कोणताही पुरावा मिळून आला नसल्यामुळे आरोपींचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१) (ब) अन्वये जवाब वगळण्यात आला.

## वादप्रश्न व निष्कर्ष

**०५.** अभियोग पक्षाची हकीकत, न्यायालयासमक्ष आलेला साक्षीपुरावा व दोन्ही पक्षांचा सखोल युक्तीवाद ऐकल्यानंतर खालीलप्रमाणे निर्णयीत करावयाचे वादप्रश्न उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारणमीमांसेसह यापुढे नोंदविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, आरोपींनी संगणमताने फिर्यादीला दगड, जे की हल्ल्याचे हत्यार म्हणुन वापरले असता मृत्युस कारण होण्याचा संभव आहे, च्या सहाय्याने इच्छापुर्वक दुखापत केली ? | **नाही** |
| २. | अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, आरोपींनी संगणमताने फिर्यादी व त्यांची आई यांना मारहाण करुन स्वेच्छापुर्वक दुखापत केली ? | **नाही** |
| ३. | अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, आरोपींनी संगणमताने फिर्यादी व त्यांच्या आईला उद्वेशपूर्वक अपमानित करुन त्यायोगे त्यांना प्रक्षोभित केले आणि अशा प्रक्षोभणामुळे त्याच्याकडुन सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा अथवा अन्य कोणता गुन्हा घडावा असा त्यामागे उद्वेश होता किंवा तसे होण्याचा संभव असल्याची त्यांना जाणीव होती? | **नाही** |
| ४. | अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, आरोपींनी संगणमताने फिर्यादी व त्यांच्या आईला जिवे मारण्याची धमकी देवून फौजदारीपात्र धाकदपटशा केला ? | **नाही** |
| ५. | काय आदेश ? | **अंतीम आदेशा प्रमाणे** |

## कारणमीमांसा

## वाद प्रश्न क्र. ०१ ते ०४ करिता

**०६.** सर्व मुद्दे एकमेकांशी संलग्न असून ग्राह्य धरला जाणारा पुरावा हा सारख्याच स्वरुपाचा असल्याने सर्व मुद्यांचा एकत्रीत विचार करणे न्यायोचीत ठरते.

**०७.** आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे फिर्यादी रामेश्वर (नि.क्र. २७) यांची साक्ष नोंदवली असुन त्यांनी दिनांक २१.०३.२०१९ रोजी लहान मुलांची भांडण झाली होती व ते रागाच्या भरात पोलिस स्टेशनला गेले होते असे सांगत या व्यतिरिक्त काही झाले नव्हते, असे कथन केले. त्यांनी पोलिस स्टेशनला फिर्याद दिल्याचे सांगितले असले तरी त्यांनी केवळ नि.क्र. २८ व नि.क्र. २९ वरील सही ओळखली असुन त्यातील मजकुर माहित नसल्याचे कथन केले आहे. सदर साक्षीदार त्यांच्या पुर्व कथनापासुन परावृत्त झाल्यामुळे त्यांना उत्तर सुचक प्रश्ने अभियोग पक्षाने परवानगीसह विचारली असता आरोपींवरील गुन्हा सिध्द करणारे किंवा अभियोग पक्षास सहकार्य करणारे कोणतेही वक्तव्य त्यांनी केले नाही.

**०८.** याउलट उलटतपासादरम्यान त्यांनी दिनांक २१.०३.२०१९ रोजी रात्री ०८.०० वाजताच्या सुमारास आरोपी त्यांच्या घरासमोर आले व शिवीगाळ करु लागले, जुन्या भांडणाचा राग मनात धरुन अनिल याने त्यांच्या डोक्यात दगड मारु डोके फोडले, त्यांची आई ही भांडण सोडवण्यासाठी आली असता तिला आरोपी पांडुरंग व वंदना यांनी मारहाण करुन दुखापत केली व जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या, याबाबी अमान्य केल्या आहेत. पुढे त्यांनी असे ही मान्य केले की, आरोपी हे त्यांचे नातेवाईक असुन त्यांच्यातील वाद आता मिटला आहे. पुढे त्यांनी नि.क्र. २५ वरील तडजोड

पुरशीसवर स्वमर्जीने व कोणाच्याही दबावाखाली न येता सही केल्याचे स्पष्ट केले आहे.

०९. पुढे अभियोग पक्षाने आरोपींवरील गुन्हा सिध्द करण्यासाठी प्रत्यक्षदर्शी तथा जखमी साक्षीदार प्रफुल्लाबाई यांची साक्ष नोंदवली असुन त्यांनी त्यांच्या साक्षीदरम्यान दिनांक २१.०३.२०१९ रोजी कोणतीही घटना घडली नाही असे कथन केले. त्यांनी पुढे स्पष्टपणे असे कथन केले की, पोलिसांनी त्यांचा जबाब नोंदवला नव्हता. अभियोग पक्षाने साक्षीदाराला परवानगीनिशी उत्तरसुचक प्रश्न विचारली. परंतु, आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करणारे किंवा अभियोग पक्षास सहकार्य करणारे कोणतेही वक्तव्य सदर साक्षीदाराच्या साक्षीदरम्यान आले नाही.

१०. अभियोग पक्षाच्या कथनानुसार आरोपींनी संगणमताने फिर्यादीस दगडाने, तसेच फिर्यादीच्या आईस मारहाण करुन स्वेच्छापूर्वक दुखापत केली. तसेच, त्यांना शिवीगाळ करुन त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा याकरिता प्रक्षोभित करुन जिवे मारण्याची धमकी देवून फौजदारीपात्र धाकदपटशा केला. आरोपींवरील गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने फिर्यादीला तपासले असले तरी फिर्यादीने घटनेस दुजोरा देणारे कोणतेही वक्तव्य न करता त्यांच्या व आरोपींमध्ये तडजोड झाल्याचे सांगितले आहे. तसेच जखमी तथा घटना प्रत्यक्ष पाहणारे व भांडणाची सोडवा सोडव करणारे साक्षीदार क्र. २ प्रफुलाबाई यांनी कोणतीही घटना घडली नसल्याचे सांगितले. तसेच त्यांनी त्यांच्या उलटतपासा त्यांच्यातील भांडण झाल्याची बाब स्पष्टपणे नाकारली आहे. त्यामुळे साक्षीदारांच्या साक्षी दरम्यान आलेल्या तफावतीमुळे व त्यांच्या विश्वासर्हतेस तडा गेल्यामुळे घटना घडलीच किंवा कसे, याबाबत स्पष्टता येत नाही.

**११.** आरोपीवरील गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने फिर्यादीला तपासले असले तरी फिर्यादीने घटनेस दुजोरा देणारे कोणतेही वक्तव्य न करता त्यांच्या व आरोपींमध्ये तडजोड झाल्याचे सांगितले आहे. जखमी साक्षीदार प्रफुल्लाबाई यांनी देखील अभियोग पक्षाच्या कथनास दुजोरा दिलेला नाही. शिवाय, त्यांच्यामध्ये तडजोड झाल्याचे दिसुन येत आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता फिर्यादीने नि.क्र. २५ अन्वये एक तडजोड पुरशीरस दाखल केली असुन त्यामध्ये फिर्यादी व आरोपींमधील वाद मिटलेला आहे तसेच ते एकमेकांचे नातेवाईक असल्याचे लक्षात येते. प्राप्त परीस्थितीमध्ये जखमी साक्षीदारांनी अभियोग पक्षास कोणतेही समर्थन दिलेले नसल्याने अभियोग पक्ष आरोपींवरील गुन्हा समंजस्य संदेहापलीकडे जाऊन सिध्द करण्यास अपयशी ठरला. त्यामुळे सदर संदेहाचा फायदा आरोपीस देणे क्रम प्राप्त ठरते. तेव्हा मुद्द क्र. १ ते ०४ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**वादप्रश्न क्र. ०५ करिता**

**१२.** वरील वादप्रश्नांचे उत्तर हे नकारर्थी आल्यामुळे आरोपींची वरील कलमांतर्गत आरोपातुन निर्दोष मुक्तता करण्याच्या निष्कर्षावर सदर न्यायालय आले आहे. सदर खटल्यामध्ये घटनास्थळावरुन एक सिमेंटचा दगड जप्त करण्यात आला असून यावर आजतागायत कोणीही आपला हक्क व अधिकार सांगितलेला नाही. तसेच सदर मुद्देमाल हा मुल्यहीन दाखविण्यात आला आहे. त्यामुळे खटल्यात जप्त करण्यात आलेला मुद्देमाल हा सदर खटल्याचा वरीष्ठ न्यायालयात दाद मागण्याच्या कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करणे न्यायोचीत वाटते. त्यामुळे वरील सर्व विश्लेषण पाहता वादप्रश्न

क्रमाक ०५ करीता मी खालील अंतीम आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

**१.** आरोपी क्र. **१. अनिल पांडुरंग वानखेडे,** आरोपी क्र. **२. पांडुरंग विठ्ठल वानखेडे** आणि आरोपी क्र. ३ **सौ. वंदना अनिल वानखेडे** यांची भारतीय दंड संहिता, १८६०, चे कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह ३४ अन्वये शिक्षापात्र अपराधातुन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८ (१) नुसार **निर्दोष मुक्तता** करण्यात येते.

**२.** आरोपींचे बंधपत्र व जामिन कदबा दोषमुक्त करण्यात येते.

**३.** आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ अन्वये **प्रत्येकी** रक्कम रुपये १५,०००/– च्या जामीनाची पुर्तता करावी.

**४.** सदर खटल्यातील एक सिमेंटचा दगड जप्त करण्यात आला असुन तो मुल्यहीन आहे. सबब, सदर मुद्देमालाची वरीष्ठ न्यायालयामध्ये दाद मागण्याच्या कालावधी नंतर नियमाप्रमाणे विल्हेवाट लावावी.

**५.** कलम ३५३(१)(क) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, नुसार निकाल खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

PRIYANKA VIJAY CHIDRE

Digitally signed by PRIYANKA VIJAY CHIDRE
Date: 2026.04.13 17:56:45 +0530

**लोहा**
**दिनांक: १३/०४/२०२६**

(पी.व्ही.चिद्रे)
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग**
**लोहा, जिल्हा नांदेड**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment/order are same word to word, as per the original judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | V. N. Thakur |
| Court Name | : | Civil Judge Jr. Div., & Judicial Magistrate, F. C., (Court No.1) Loha, Tq. Loha, Dist. Nanded. |
| Date | : | 13/04/2026. |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 13/04/2026. |
| Judgment/order uploaded on | : | 13/04/2026. |

VAIBHAVSING NARAYANSING THAKUR

Digitally signed by VAIBHAVSING NARAYANSING THAKUR
Date: 2026.04.13 17:57:59 +0530

Stenographer
(Grade-III)